आपली माणसं, आपलं दैनिक!

# गोवादूत

पणजी : सोमवार, ३१ ऑगस्ट २०१५ वर्ष : ११ अंक : १०२ पाने : १४

# नभ मेघांनी भरले, झाड ओथंबून गेले...

## श्रावणोत्सवातील काव्यसरींनी रसिक चिंब

**दोडामार्ग, दि.३० (प्रतिनिधी)**

श्रावण महिन्यात सर्व धरणी हिरवागार शालू पांघरून नवं रूप धारण करते, निसर्गात अनेक बदल होत असतात. या प्रसन्न व मांगल्यपूर्ण चैतन्यमय वातावरणाच्या पार्श्वभूमीवर येथील लक्ष्मीकांत सीताराम हबळे महाविद्यालयात मराठी भाषा व वाङ:मय मंडळाच्या उद्‌घाटनानिमित्त 'श्रावणोत्सव' हा पावसाळी कवितांवर आधारीत कार्यक्रम अयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला गोव्यातील कवयित्री सौ. पौर्णिमा केरकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. यावेळी श्रावण महिन्यातील



पौर्णिमा केरकर

बदलांचे चित्रण करणाऱ्या कविता त्यांनी सादर केल्या. 'नभ मेघांनी भरले, झाड ओथंबूनी गेले, श्रावणरंगी धून बरसली, दव बिंदूतून इंद्रधनूचे रंग खुलले, फुलां –फुलांमधूनी गीत उमलले, श्रावणातला पाऊस हा असा पाठशिवणीचा खेळ खेळणारा, आपल्यालाही एखादी सर अंगावर घ्यावीशी वाटणारा, अशा शब्दांत त्यांना 'काव्यमैफलीला बहार आणली. डोंगरावरचा पाऊस, माळावरची वाऱ्यावर डोलणारी रंगीबेरंगी फुले, त्यावर फुला – पाखरांचं स्वच्छंदी बागडणं, चिंब भिजणारी झाडे, उडणारे पक्षी हाच पाऊस आपल्याला जगायला प्रेरणा देतो. झुळझुळ वाहणाऱ्या झऱ्यासारखं जगायला शिकवतो. आपल्या जगण्याला अर्थ देतो आणि दु:ख विसरायला लावतो, अशा शब्दांत केरकर यांनी कवितेची महती शब्दबद्ध केली.

'श्रावण पुंखात भारलेले श्वास झाले ओले, ऋतु कूस बदलताना, मन आभाळ जाहलेले, निळ्या नभाच्या निळाईत, निर्झर वेडावलेले.' अशा विविध निसर्गरम्य कविता त्यांनी सादर करून विद्यार्थ्यांना काव्यरुपी श्रावणसरीत चिंब भिजण्याचा आनंद दिला.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पावसावरच्या विविध कविता सादर केल्या. कु. प्रणाली शेटकर हिने 'सासोलीची पावस तिरपो तिरपो पडता' ही कविता सादर करून वाहव्वा मिळवली. कार्यक्रमाच्या प्रा. दिलीप बर्वे यांनी कार्यक्रमाची भूमिका विशद केली. यावेळी प्रा. प्रशांत ढेपे, प्रा. एम. टी. बेग, प्रा. सोनम देसाई उपस्थित होते. सूत्रसंचालन कु. स्वाती फाटक हिने तर आभार एस. पाडगावकर यांनी मानले.